**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २८ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.९१** **दिनांक : २४/१२/२०२४**
**विभाग :** प्रकल्प विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमध्ये सर्वांसाठी घरे संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेची (शहरी ) २.० ची अंमलबजावणी करणेस मान्यता मिळणे बाबत.

---*---

**ठराव :-** अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीमध्ये सर्वांसाठी घरे संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेची (शहरी ) २.० ची अंमलबजावणी करणे बाबतद Housing for All Mission Scheme Guidelines September २०२४ व गृहनिर्माण विभाग,शासन निर्णय क्रमांक प्रअयो -२०२४ / प्र.क्र.८७ गृनियो- २ दि.१५ ऑक्टोंबर २०२४ मा.शासन निर्णयानुसार सर्वासाठी घरे संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी ) २.० महानगरपालिका हद्दीमध्ये राबविणेच्या अनुषंगाने प्रकल्प विभागाने प्रस्तावित केलेनुसारच्या प्रस्तावास मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देणेत येत आहे.

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २८ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.९२** **दिनांक : २४/१२/२०२४**
**विभाग :** सार्व.बांधकाम विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** सार्व.बांधकाम विभागातील टोनर रिफीलींग ,ओ.पी.सी.ड्रम व एम.आर.सी.रोलर इत्यादीकामी झालेल्या खर्चास मान्यता मिळणे बाबत.

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार सार्व.बांधकाम विभागातील टोनर कार्टेजचा ड्रम खराब होणे तसेच प्रिंटरच्या टोनरमधील शाई संपत असल्यामुळे प्रिंट फिकट येणे,अस्पष्ट येणे यामुळे सदरच्या टोनर मधील ओ.पी.सी.ड्रम नविन टाकून रिफीलींग करून घेणे अत्यंत आवश्यक आहे.सार्व.बांधकाम विभागामध्ये टोनर नसल्यामुळे प्रिंट काढण्यास अडचणी येत असल्याने सदरचे टोनर रिफिलींगचे व कार्टेज व प्रिंटर दुरूस्तीची कामे.स्टोअर विभागाकडील मंजुर निविदा धारक कृष्णन कॉम्प्युटर्स यांचे कडून करून घेण्यात आलेली आहे. सदर कामाच्या बिलाची रक्कम रू.६२७०/-(रू.सहा हजार दोनशे सत्तर फक्त ) असून सदर देयकास एका वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असल्याने महासभेची मंजुरी आवश्यक आहे.

विभागाने प्रस्तावित केलेनुसार सदरच्या कामास व खर्चास तसेच सदर कामाचा धनादेश रक्कम रू.६२७०/-(रू.सहा हजार दोनशे सत्तर फक्त ) कृष्णन कॉम्प्युटर्स,अहिल्यानगर यांचे नांवे काढण्यास मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

**नगरसचिव विभाग**

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक – २८ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.९३** **दिनांक : २४/१२/२०२४**

**विभाग :** आस्थापना विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** कै.श्री.तुकाराम भगवंता जपकर,बिगारी / वॉचमन त्यांच्या स्वत:चे सादर केलेले वैदयकिय खर्चाचे परतावा देयक अदा करणेस मान्यता मिळणे बाबत.

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार कै.श्री.तुकाराम भगवंता जपकर,बिगारी/ वॉचमन हे अहिल्यानगर महानगरपालिकेमध्ये आस्थापना सुचिवर कायम कर्मचारी म्हणून कार्यरत होते.त्यांचे दि.३१/०७/२०२२ रोजी निधन झालेले असून त्यांचे वारस पत्नी श्रीमती मंदा तुकाराम जपकर यांनी त्यांच्या पतीचे सादर केलेले वैदयकीय प्रतिपुर्ती देयक असून सदरचे देयक रू.३,००,०००/- पेक्षा जास्त असल्याने सदरच्या प्रस्तावास मा.महासभेची मंजुरी आवश्यक आहे.

तरी कै.श्री.तुकाराम भगवंता जपकर,बिगारी/ वॉचमन यांचे वैदयकीय प्रतिपुर्ती देयक रक्कम रूपये ६,९७,७१८/- (अक्षरी सहा लाख सत्यान्नव हजार सातशे अठरा रू.फक्त) इतकी होत असुन सदरची रक्कम संबंधीतास अदा करणेस मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक: एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २८ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.९४** **दिनांक : २४/१२/२०२४**

**विभाग :** आस्थापना विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** श्री.काळे बबन लक्ष्मण ,लिपीक टंकलेखक यांनी त्यांच्या पत्नीचे सादर केलेले वैदयकीय खर्चाचे परतावा देयक अदा करणेस मान्यता मिळणे बाबत.

---*---

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्य प्रस्तावानुसार अहिल्यानगर महानगरपालिकेतील श्री.बबन लक्ष्मण काळे , लिपीक टंकलेखक यांनी त्यांच्या पत्नी सौ.सुगंधा बबन काळे यांचे वैद्यकीय खर्चाचे प्रतिपुर्ती बिल सादर केले असून सादर केलेले वैदयकीय प्रतिपुर्ती देयक रू. रू.३,००,०००/- पेक्षा जास्त असल्याने सदरच्या प्रस्तावास मा.महासभेची मंजुरी आवश्यक आहे.

तरी सौ.सुगंधा बबन काळे यांच्या वैदयकीय प्रतिपुर्ती देयक रक्कम रूपये ३,५१,८७६/- (अक्षरी तीन लाख एकावन्न हजार आठशे शहात्तर रू.फक्त) इतकी होत असुन सदरची रक्कम संबंधीतास अदा करणेस मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २८ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.९५** **दिनांक : २४/१२/२०२४**

**विभाग :** आस्थापना विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** शहरातील जुनाट कचरा,रस्ता दुभाजकांच्या बाजूची माती व गवत काढणे कामी वाहययंत्रणेमार्फत मजुर पुरवठा करून घेवून कचरा खाजगी वाहनांव्दारे संकलन व वाहतुक केलेबाबतच्या कामास व देयक अदा करणेस मान्येते बाबत

---*---

**ठराव :-** विभागाने फेरसादर केलेल्या प्रस्तावा नुसार स्वच्छता पंधरवाडा अंतर्गत तसेच दि.०१/१०/२०२३ पासून महानगरपालिका कर्मचा-यांचा अहिल्यानगर ते मुंबई लॉग मार्च आंदोलन सुरू होते. सदर आंदोलनामध्ये सर्व कर्मचारी सहभागी झालेले होते. त्यामुळे शहरातील दैनंदिन साफसफाईच्या कामामध्ये अडथळा निर्माण झालेला होता. घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील सफाई कामगार ,मुकादम हे संपामध्ये सहभागी झालेले असल्यामुळे सदर आंदोलन काळामध्ये माती व काढण्यात आलेले गवत हे जे.सी.बी. व्दारे उचलून ट्रॅक्ट्ररव्दारे वाहतूक करण्यात आलेली होती. सदर कामी मे गुरूदत्त अर्थमुव्हर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर यांनी देयक रक्कम रू ५,५२,६५३/- वस्तु व सेवा करासह सादर केलेले असून मा.आयुक्त यांची दि.२६/०२/२०२४ रोजी मान्यता घेण्यात आलेली होती. सदरची मान्यता ही मंजुर अर्थसंकल्प सन २०२३-२४ मधील खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक या लेखाशिर्षामधून अदा करणेस मान्यता घेण्यात आलेली होती. परंतु त्यावेळेस सदर लेखाशिर्षातील तरतुद संपुष्टात आलेली असल्यामुळे सदर देयक अदा करणेस अडथळा निर्माण झालेला होता.

प्रस्तावीत नुसार सन २०२४-२५ मधील खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक या लेखाशिर्षामधून खर्च करणेस मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक: एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २८ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.९६** **दिनांक : २४/१२/२०२४**

**विभाग :** सामान्य प्रशासन विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिकेसाठी नविन बोधचिन्ह वापरणेकामी नागरीकांच्या हरकती व सुचना च्या अनुषंगाने नविन बोधचिन्ह अंतिम करणे बाबत.

---*---

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, अहिल्यानगर महानगरपालिकेसाठी नविन बोधचिन्ह वापरणेकामी नागरीकांच्या हरकती व सुचना च्या अनुषंगाने विनंती प्रस्ताव सादर करण्यात येते की, उक्त संदर्भिय राजपत्रामध्ये नमुद केलेनुसार क्रमांक-अमपा-२०२४/प्र.क्र.१९४/नवि-२५ - ज्या अर्थी भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने महाराष्ट्र शासनाच्या प्रस्तावास "अहमदनगर " शहराचे नांव बदलून "अहिल्यानगर" असे करण्यास दिनांक ०१ ऑक्टोंबर २०२४ रोजी अनुमती दिली आहे. आणि ज्याअर्थी, सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.गानाब-२७२२ /प्र.क्र.१५६/जपुक (२९) दिनांक ४ ऑक्टोंबर २०२४ अन्वये " अहमदनगर " शहराचे नांव बदलून " अहिल्यानगर " असे करण्याचे आदेश दिले आहेत. त्याअर्थी, महाराष्ट्र शासन या अधिसूचनेद्वारे असा आदेश देत आहे की, " अहमदनगर महानगरपालिकेचे " नांव बदलून " अहिल्यानगर महानगरपालिका " असे करण्यात यावे, अशा बाबत उक्त राजपत्रामध्ये नमुद करण्यात आले आहे.

उक्त संदर्भिय महाराष्ट्र शासन राजपत्रांचे अनुषंगाने महानगरपालिका इमारतीच्या कार्यालयावरील नावे, फलक, दस्तऐवज, संकेतस्थळ, पोर्टल, लेटरपॅड,संचिका,रजिष्टर,मनपाची वाहने, इत्यादींसह आवश्यक त्या सर्व दस्तऐवजांमध्ये व इतर तद्नुषंगिक विविध बाबी इत्यादींमध्ये आवश्यकतेनुसार **"अहमदनगर महानगरपालिका"** या नावाचे ऐवजी **"अहिल्यानगर महानगरपालिका"** असा बदल करणेत आलेला आहे.

तथापि अहिल्यानगर महानगरपालिकेचे बोधचिन्ह हे जुने आहे. व सदरील बोधचिन्ह हे अहमदनगर महानगरपालिका असे नाव असतांना वापरण्यात येत होते. जुन्या बोधचिन्हामध्ये ऐतिहासिक वास्तुचे वर इंडस्ट्रीयलची निशानी छापण्यात आलेली आहे. तसेच " निरंतर नगरसेवा " हे घोषवाक्य छापण्यात आलेले आहे. सोबत प्रत जोडली आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे नाव बदलून अहिल्यानगर महानगरपालिका असे करण्यात आलेले असल्यामुळे सदर नावास समर्पक,आकर्षक व सुंदर बोधचिन्ह असणे क्रमप्राप्त आहे. सोबत प्रत जोडली आहे.

नविन बोधचिन्हामध्ये ऐतिहासिक वास्तुचे चित्र असुन किल्ल्याचे मध्यभागी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे अश्वारुढ चित्र असून डाव्या हातामध्ये तलवार दर्शविलेली आहे. ऐतिहासिक वास्तुचे वर भगवा ध्वज असून ध्वजाचे खाली छत्रपती शिवाजी महाराज यांची राजमुद्रा आहे. सदर बोधचिन्हामध्ये ऐतिहासिक

वास्तुचे दोन्ही बाजुस प्रत्येकी एक ढाल व दोन तलवारी दर्शविण्यात आलेल्या आहेत. तसेच " विश्वास निरंतर जनसेवा तत्पर " हे घोषवाक्य दर्शविण्यात आलेले आहे.

तरी जुने बोधचिन्हाचे ऐवजी नविन बोधचिन्ह वापरणेकामी नागरिकांच्या हरकती व सुचना दिनांक ०५-१२-२०२४ ते ११-१२-२०२४ या कालावधीमध्ये मागविण्यात आल्या होत्या. उक्त कालावधीमध्ये ०१. श्री.अभय ललवाणी ०२. श्री.भुषण देशमुख ०३. श्री.वसंत विटणकर यांच्या हरकती विहित कालावधीमध्ये प्राप्त झाल्या होत्या. सदर आलेल्या हरकतींवर दिनांक १६-१२-२०२४ रोजी दुपारी १२-३० वाजता सुनावणी घेण्याचे ठरविण्यात आले होते. तथापि श्री.अभय ललवाणी यांनी ईमेल द्वारे सुनावणीची पुढील तारीख मिळणेबाबत विनंती केली. त्यामुळे उक्त सुनावणी दिनांक १८-१२-२०२४ रोजी दुपारी १२-३० वाजता घेण्यात आली. सदर सुनावणीस श्री.अभय ललवाणी हे हजर होते व श्री.भुषण देशमुख व श्री.वसंत विटणकर हे गैरहजर होते. सदर सुनावणीमध्ये आलेल्या हरकतींचे अनुषंगाने उपस्थित हरकतदार श्री.अभय ललवाणी यांना सुनावणीमध्ये नविन बोधचिन्हांचे अनुषंगाने माहिती देण्यात आली व गैरहजर हरकतदार श्री.भुषण देशमुख व श्री.वसंत विटणकर यांना दुरध्वनीद्वारे माहिती देण्यात आली. मनपाचे वतीने हरकतदारांना दिलेल्या माहितीने समाधान झाले.

०१. श्री.अभय ललवाणी ०२. श्री.भुषण देशमुख ०३. श्री.वसंत विटणकर या हरकतदारांनी केलेल्या हरकतीमधील सुचनांची दखल घेण्यात आली. सोबत आलेल्या हरकती व त्यावर अहिल्यानगर महानगरपालिकेने दिलेले स्पष्टीकरण जोडले आहे.

तरी हरकत दारांनी केलेल्या हरकतीचे अनुषंगाने सध्याच्या बोधचिन्हामध्ये **"अहिल्यानगर महानगरपालिका"** नांवाचा बदल करुन सध्या आहे तेच बोधचिन्ह अंतिम करण्यास मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | प्रशासक, |
| अहिल्यानगर महानगरपालिका, | अहिल्यानगर महानगरपालिका, |

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २८ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.९७** **दिनांक : २४/१२/२०२४**

**विभाग :** सामान्य प्रशासन विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** सहाव्या वेतन आयोगानुसार पदाच्या वेतनश्रेणी प्रमाणे नेमणुक दिनांकापासुन वेतन निश्चिती करून फरक मिळणे बाबत.

---*---

**ठराव :-** विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार,अहिल्यानगर महानगरपालिकेतील अनुकंपा व वारसा हक्काने नियुक्ती केलेल्या कर्मचा-यांनी संदर्भिय अर्ज देऊन " आमची मा. महासभा ठराव क्र. ०६ दिनांक २२/०६/२०१० व मा. महासभा ठराव क्र. २९ दि. १५/१०/२०१३ अन्वये मंजुर ठरावानुसार एकत्रित वेतनश्रेणीवर नेमणुक देण्यात आलेल्या आहेत. सदर नेमणुका दिल्यानंतर आम्हांला मा. महासभा ठराव क्र. ५२ दि. १६/०३/२०१६ रोजीच्या ठरावान्वये नियमित वेतनश्रेणीनुसार वेतन देणेबाबत मान्यता देण्यात आलेली असुन ठराव पारित करण्यांत आलेला आहे. परंतु आमची नियमित वेतनश्रेणी नुसार नेमणुक दिनांकापासुन वेतननिश्चिती करण्यात आलेली नसुन ठराव पारित झाल्याच्या दिनांकापासुन वेतननिश्चिती करण्यांत आलेली आहे. तरी आम्हांला आमच्या पदाच्या सहाव्या वेतन आयोगानुसार लागू असलेली वेतनश्रेणी नुसार नेमणुक दिनांकापासुन वेतन निश्चिती करुन त्याचा फ़रक मिळावा." अशी विनंती केलेली आहे.

मा. महासभेने ठराव क्र.५२ दिनांक १६/०३/२०१६ नुसार वारसा हक्काने, सरळसेवेने व अनुकंपा तत्त्वानुसार एकत्रीत वेतनावर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना ठरावाच्या दिनांकापासुन नियमित वेतनश्रेणी लागु करुन तसे आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे.

तथापी, सदर ठरावानुसार एकत्रित वेतनावर व वेतनश्रेणीवर वारसा हक्काने, सरळसेवेने व अनुकंपा तत्त्वानुसार नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना नियुक्ती दिनांकापासुन वेतनश्रेणी लागू केलेली नसुन कायम केल्याच्या दिनांकापासुन वेतनश्रेणी लागू केलेली आहे.

तरी, श्री. राहुल जगन्नाथ शिंदे व इतर १३ कर्मचा-यांनी दिनांक १३/०३/२०२४ रोजी दिलेल्या विनंती अर्जानुसार सोबत जोडलेल्या यादीतील एकत्रित वेतन / वेतनश्रेणीवर वारसा हक्काने, सरळसेवेने व अनुकंपा तत्त्वानुसार नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना नियुक्ती दिनांकापासुन वेतनश्रेणी लागू करण्यास तथापी यानुसार निघणारा फरक देय राहणार नाही यास मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | प्रशासक, |
| अहिल्यानगर महानगरपालिका, | अहिल्यानगर महानगरपालिका, |